1/7231897/20

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# पशुसंवर्धन विभाग

## // प्रेस नोट //

मिरा भाईदर महानगरपालिका आणि पशुसंवर्धन विभाग (महाराष्ट्र शासन) यांच्या सयुक्त विद्‌यमाने महानगरपालिका क्षेत्रात **21 व्या पशुगणनेला दि. 25 नोव्हेंबर 2024 रोजी प्रारंभ झाला आहे. दिनांक 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत** होणाऱ्या पशुगणनेसाठी येणाऱ्या प्रगणकांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडुन करण्यात येत आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पशुसंवर्धन व दुग्धव्यावसाय विभागाच्यावतीने दर पाच वर्षानी पशुधनाची गणना केली जाते. पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आणि मिरा-भाईदर महानगरपालिकेचा पशुवैद्‌यकीय विभाग यांच्या संयुक्त विद्‌यमाने मिरा-भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोबाईल ॲप्लिकेशनच्या मदतीने पशुगणना करण्यात येईल प्रगणक घरोघरी प्रत्यक्ष भेट देऊन पशुपालकांची घरगुती उद्‌योग आणि गैर घरगुती उपक्रम इत्यादींमध्ये वर्गवारी करून त्यांच्याकडे उपलब्ध प्राण्यांच्या प्रजाती **(उदा. श्वान, गुरे, म्हैस, मेंढी, शेळी कुक्‌टपक्षी)** यांचे वय लिंग जातीनुसार मोबाईल ॲप्लिकेशन मध्ये नोंद घेतील.

दिनांक 25 नोव्हेंबर 2024 पासून राज्यभरात पशुगणनेस सुरुवात झाली असून दि. 28 फेब्रुवारी 2025 पर्यत सुरू राहील या कालावधी दरम्यान आपल्या घरी पशुगणनेसाठी येणाऱ्या प्रगणकांना नागरिकांनी माहिती उपलब्ध करून द्‌यावी तसेच सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

Signed by Kalpita Kishor
Pimple
Date: 19-12-2024 00:20:52

**उप-आयुक्त (पशुसंवर्धन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner